महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग,

मंत्रालय विस्तार, ४ वा मजला, दालन क्र. ४६०,

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई- ३२

Email ID : deskf10.rfd-mh@gov.in

---

क्रमांक : एफएलडी-२०२२/प्र.क्र.२३६/फ-१० दिनांक : १२ सप्टेंबर, २०२२.

प्रति,

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, नागपूर.
मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), पुणे.
उपवनसंरक्षक, पुणे.

विषय:- वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत म्हस्केवस्ती ते इरिगेशन बंगलो (Km ०/३०० to Km १/४८०) आणि अंथुर्णे, म्हस्केवस्ती - विरोबा मंदीर (Km १/४८० to Km २/६६०) या रस्त्याच्या कामाकरीता मौजे- भरणेवाडी, ता. इंदापूर, जि.पुणे येथील अनुक्रमे ०.९९७१ हे. आणि ०.९९७१ हे. राखीव वनजमीन वळतीकरणाबाबत..

संदर्भ:- (१) केंद्रस्थ अधिकारी यांचे क्र. Desk-17/Nodal/Dhule/ID-13012(34)/1246/2022-23, नागपूर यांचे दिनांक १९.०८.२०२२ रोजीचे पत्र.

(२) केंद्रस्थ अधिकारी यांचे क्र. Desk-17/Nodal/Dhule/ID-13012(34)/1247/2022-23, नागपूर यांचे दिनांक १९.०८.२०२२ रोजीचे पत्र.

संदर्भाधीन क्र. १ व २ येथील दिनांक १९.०८.२०२२ रोजीच्या पत्रान्वये म्हस्केवस्ती ते इरिगेशन बंगलो (Km ०/३०० to Km १/४८०) आणि अंथुर्णे, म्हस्केवस्ती - विरोबा मंदीर (Km १/४८० to Km २/६६०) या रस्त्याच्या कामाकरीता मौजे- भरणेवाडी, ता. इंदापूर, जि.पुणे येथील अनुक्रमे ०.९९७१ हे. आणि ०.९९७१ हे. राखीव वनजमीन वळतीकरणाचे दोन स्वतंत्र प्रस्ताव सादर केले आहेत.

२. सदर प्रस्तावामधील रस्त्याच्या Chainage व KML File चे अवलोकन केले असता, म्हस्केवस्ती ते इरिगेशन बंगलो (Chainage Km ०/३०० to Km १/४८०) आणि अंथुर्णे, म्हस्केवस्ती - विरोबा मंदीर (Chainage Km १/४८० to Km २/६६०) या प्रस्तावित रस्त्याच्या Chainage व रस्त्याची KML File वरुन उक्त दोन रस्ते हे स्वतंत्र नसून, एकच असल्याचे दिसून येते. एका रस्त्यासाठी एकच प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे. १.०० हे. क्षेत्रापेक्षा अधिक वनक्षेत्र वळती करावयाचे असल्यास पर्यायी वनीकरणासाठी वनेत्तर जमीन प्रस्तावित करावी लागते. वनेत्तर जमीन प्रस्तावित करण्याचे टाळण्यासाठी एकच सलग रस्ता दोन भागात विभागून, दोन स्वतंत्र प्रस्ताव जाणीवपूर्वक सादर केले असल्याचे दिसून येते. ही बाब गंभीर आहे.

३. एका सलग रस्त्याला विभागून, दोन स्वतंत्र प्रस्ताव सादर करण्यामागील कारणमीमांसा व स्पष्टीकरण शासनास सादर करावे.

(गणेश जाधव)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत माहिती व कार्यवाहीस्तव अग्रेषित :-

प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर